आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३० मे २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कापसावरील आयात शुल्क आणखी ५ महिन्यांसाठी माफ
- तांत्रिक अडचणींमुळं CUET - UG परीक्षेला विलंब, सुमारे पावणे ४ हजार विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी मिळणार
- गायीला राष्ट्रीय प्राणी घोषित करण्याचा किंवा देशभरात गोहत्येवर बंदी लादण्याचा प्रस्ताव विचाराधीन नसल्याचं केंद्र सरकारचं स्पष्टीकरण
- कर्नाटक काँग्रेसच्या विधीमंडळ पक्षनेतेपदी डी. के. शिवकुमार यांची निवड, बुधवारी मुख्यमंत्रीपदाचा शपथविधी

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता मन की बात द्वारे देशवासियांना संबोधित करणार

**<><><><><>**

देशात होणाऱ्या कापसाच्या आयातीवरच सर्व प्रकारचं आयात शुल्क पुढच्या पाच महिन्यांसाठी माफ केल्याचं सरकारने जाहीर केलं आहे. हा नियम १ जून २०२६ पासून ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत लागू असेल असं अर्थमंत्रालयाने काढलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. देशातल्या वस्त्रोद्योगाला, विशेषतः एमएसएमई क्षेत्राला पुरेसा कच्चा माल रास्त दरात उपलब्ध व्हावा यासाठी हे पाऊल उचलल्याचे अर्थमंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय विद्यापीठांमधल्या पदवी अभ्यासक्रमासाठीची प्रवेश परीक्षा असलेल्या CUET-UG मध्ये आज तांत्रिक अडचणी आल्या. त्यामुळं ३ हजार ७६५ विद्यार्थ्यांना ही परीक्षा पुन्हा देण्याची संधी NTA अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं उपलब्ध करुन दिली आहे. परीक्षा केंद्रात बायोमेट्रीक पडताळणी झाल्यावर तांत्रिक

अडचणीमुळं परीक्षा देता येणार नाही असं लक्षात आल्यानं हे विद्यार्थी निघून गेले होते. परीक्षेची नवीन तारीख नंतर जाहीर करणार असल्याचं NTA नं सांगितलं आहे.

सकाळच्या सत्रात तांत्रिक अडचणीमुळं परीक्षा काही ठिकाणी सुमारे २ तास उशिरा सुरू झाली. त्यामुळं दुपारचं सत्रही उशिरा सुरू झाल्याचं संस्थेनं कळवलं. ही परीक्षा घेणाऱ्या टीसीएस आयऑन संस्थेनं तांत्रिक अडचणींचा अहवाल NTA ला सादर केला आहे.

**<><><><>**

महानगर गॅसनं वाहनांसाठी वापरल्या जाणारा सीएनजी आणि पाईपद्वारे पुरवल्या जाणाऱ्या घरगुती वापराच्या पीएनजीच्या दरात वाढ केली आहे. सीएनजी प्रतिकिलो २ रुपयांनी महाग झाल्यानं एक किलो सीएनजी साठी आता ८६ रुपये मोजावे लागतील. पीएनजीच्या दरात प्रती युनिट ५० पैशांनी वाढ केल्यानं, त्याचा प्रति युनिट दर ५२ रुपयांवर पोचला आहे.

**<><><><>**

गायीला राष्ट्रीय प्राणी म्हणून घोषित करण्याचा किंवा देशभरात गोहत्येवर बंदी घालण्याचा कोणताही प्रस्ताव सध्या केंद्र सरकारच्या विचाराधीन नाही, असं केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल आज म्हणाले. एका खासगी वृत्तसंस्थेने घेतलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. देशभरातल्या विविध गटांकडून अशा मागण्या सातत्याने येत असतात. गोहत्येसंबंधीचे कायदे प्रत्येक राज्यात वेगवेगळे आहेत आणि अनेकदा स्थानिक परिस्थिती आणि बाबींचा विचार करूनच त्याबाबत निर्णय घेतले जातात, असं मेघवाल यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या दुसऱ्या टप्प्यासह देशाचं सशस्त्र दल कोणत्याही लष्करी मोहीमेसाठी तयार असल्याचं देशाचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यात खडकवासला इथं राष्ट्रीय संरक्षण अकादमीच्या दीडशेव्या तुकडीच्या दीक्षान्त संचलनाला संबोधित करताना बोलत होते. ऑपरेशन सिंदूरमधून सशस्त्र दलांमधील परस्पर समन्वयाचे महत्त्व अधोरेखित झाले असे ते म्हणाले.

या तुकडीतून १८ महिला आणि १२ मित्र देशातल्या २४ कॅडेटसह एकूण ३५३ कॅडेट्स उत्तीर्ण झाले. पदवी प्राप्त केलेल्या कॅडेट्सनी वेगानं बदलत असलेल्या संरक्षण विषयक परिस्थितीत सातत्यानं शिकत राहणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले. हे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या महिला कॅडेट्सच्या कामगिरीचंही त्यांनी कौतुक केलं. शौर्य, जिद्द आणि लष्करी उत्कृष्टता या गुणांना लिंगभेद नसतो असं ते म्हणाले.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूर दरम्यान देशाच्या नौदलानं पाकिस्तानच्या संपूर्ण नौदलाला त्यांच्या बंदरांमध्येच अडकवून ठेवलं होतं असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. लखनऊ इथं आज नौसेना शौर्य वाटिका या खुल्या नौदल संग्रहालयाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. या मोहिमे दरम्यान पाकिस्तानवरचा दबाव टिकवून ठेवण्यात भारतीय नौदलानं महत्त्वाची भूमिका बजावली. आपलं नौदल अरबी समुद्रात पूर्ण सज्जतेनं आणि ताकदीनं तैनात होतं, परिणामी पाकिस्तानचं संपूर्ण नौदल स्वतःच्याच बंदरांमध्ये अडकून राहीलं असं ते म्हणाले.

<><><><><>

कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी डी. के. शिवकुमार यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यासाठी आमंत्रित केलं आहे. ३ जून रोजी संध्याकाळी

नव्या मंत्रीमंडळाचा शपथविधी होईल. त्यापूर्वी काँग्रेस विधीमंडळ पक्षाच्या नेतेपदी शिवकुमार यांची निवड झाली. त्यानंतर त्यांनी काळजीवाहू मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांच्यासह राज्यपालांकडे सरकार स्थापनेचा दावा केला.

सिद्दरामय्या यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानं शिवकुमार यांना ही संधी मिळाली आहे.

**<><><><><>**

AIADMK च्या चार आमदारांना आमिष दाखवून TVK नं पक्षात घेतल्याचा आरोप AIADMK नं केला आहे. याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी पक्षाचे प्रतोद अग्री एस एस कृष्णमूर्ती यांनी आज राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांना केली. या चार आमदारांनी पक्षादेश न मानता टीव्हीके पक्षाला मतदान केलं होतं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या 'मन की बात' कार्यक्रमातून उद्या सकाळी अकरा वाजता जनतेशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३४ वा भाग असणार आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणीच्या संकेतस्थळावर तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवरून प्रसारित केला जाणार आहे. या संबोधनाचा मराठी अनुवाद रात्री आठ वाजता आकाशवाणीवरून प्रसारित होईल.

**<><><><><>**

पाकिस्तानच्या आयएसआय आणि मुंबईच्या अंडरवर्ल्डशी संबंधित नऊ जणांना दिल्ली पोलिसांच्या एका विशेष पथकाने आज अटक केली आहे. देशविघातक कृत्यांमध्ये सामील असल्याच्या आरोपावरून ही कारवाई करण्यात आली. देशभरात टाकलेल्या छाप्यांमधून सुरक्षा दलांनी शस्त्रास्त्रांचा मोठा साठा हस्तगत केला आहे.

अटक केलेल्यांमध्ये मुंबईतल्या दोन जणांचा तसेच नेपाळी नागरिकांचाही समावेश आहे. देशभरातले अणुऊर्जा प्रकल्प, वीज उत्पादन प्रकल्प, रेल्वे स्थानक, विमानतळ इत्यादी महत्त्वाच्या ठिकाणांवर हल्ले करण्याच्या सूचना या व्यक्तींना मिळाल्या होत्या. पाकिस्तानातल्या कुख्यात गुंडाशी समाजमाध्यमाद्वारे संपर्कात असलेल्या देशभरातल्या सुमारे ६०० संशयितांना पोलिसांनी ओळखून काढलं आहे. या कारवायांमध्ये कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम आणि ISI ही पाकिस्तानी गुप्तचर संस्था एकत्रितरित्या सामील असल्याचा निष्कर्ष अन्वेषण संस्थांनी काढला आहे.

<><><><>

ते भारताच्या ५ दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. राष्ट्रध्यक्ष म्हणून हा त्यांचा पहिलाच भारत दौरा आहे. केंद्रीय परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तिवर्धन सिंग यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. त्यापूर्वी राष्ट्राध्यक्षांनी बिहारमध्ये गया इथे महाबोधी मंदिराला भेट दिली.

<><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीचं अजिंक्यपद यंदा नव्या टेनिसपटूकडे जाणार, हे स्पष्ट झालं आहे. पुरुष एकेरीच्या तिसऱ्या फेरीत काल १९ वर्षांचा जुआओ फॉन्सेका यानं दिग्गज टेनिसपटू नोव्हाक जोकोविच याला पराभवाचा धक्का दिला. अटीतटीच्या या सामन्यात पहिले दोन सेट्स गमावल्यानंतर फॉन्सेकानं जोरदार पुनरागमन करत सामना ४-६, ४-६, ६-३, ७-५, ७-५ असा जिंकला. अग्रमानांकित यानिक सिनर, दानील मेदवेदेव, टेलर फ्रिट्झ हे आघाडीचे टेनिसपटू यापूर्वीच स्पर्धेबाहेर गेले आहेत.

महिला एकेरीत अग्रमानांकित अरीना साबालेंका, एलिना स्वितोलीना, मिरा अँड्रीव्हा, इगा श्वियांतेक, नाओमी ओसाका यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना नमवत पुढच्या फेरीत प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं आज पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत सामन्यात त्यांनी कोरियाच्या अग्रमानांकित जोडीवर मात केली.

या स्पर्धेच्या मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीतल्या सामन्यात मात्र आज ध्रुव कपिल आणि तनिषा क्रॅस्टो या भारतीय जोडगोळीला पराभवाचा धक्का बसला.

**//<><><><><>//**